**नियमित दिवाणी दावा क्र. ४२२/२००५ मध्ये नि.क्र. ८७ कडील अर्जावर**

**आदेश**

१) याकामी योग्य ते न्यायाचे आदेश करावेत या विनंतीचा प्रस्तुत अर्ज वादींतर्फे दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज वाचला. प्रस्तुत अर्जास प्रतिवादीतर्फे दिलेले निशाणी क्र. ८८ कडील म्हणणे वाचले. प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२) वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये असे कथन केले आहे की, निशाणी क्र. ४० कडील अर्जावरील आदेशाप्रमाणे कमिशन काम केले नाही म्हणून वादीतर्फे निशाणी क्र. ५२ कडे दिलेल्या अर्जावरुन पुन्हा कोर्ट हुकूमाप्रमाणे काम पूर्ण करण्याचा आदेश दिनांक ०३/०८/२०१६ रोजी झाला आहे. सन २०१६ पासून निशाणी क्र. ८५ नुसार काढलेल्या कारणे दाखवा नोटीसचे म्हणणे दाखल करेपर्यंत म्हणजे दिनांक २१/०३/२०२३ रोजीपर्यंत कमिशन फी भरण्याबाबत वादीला कळविले नव्हते. निशाणी ५२ प्रमाणेचे फेर कमिशनचे काम हे मुळ कमिशन फीच्या १/३ हिस्स्याची फी भरुन घेऊन पुर्ण करण्याचे असताना उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय यांनी अति तातडीच्या मोजणीसाठी रुपये १२,०००/– व तातडीच्या मोजणीसाठी रुपये ८,०००/– इतकी फी भरण्याचे कळवून कर्तव्यात कसूर केला आहे. वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये अशी विनंती केली आहे की, या कामी योग्य ते न्यायाचे आदेश करावेत.

३) वादींना न्यायालयाकडून नेमका कोणता दिलासा हवा आहे व नेमका कोणता आदेश हवा आहे याबाबत वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये कोणतीही स्पष्ट विनंती केलेली नाही. वादींची या अर्जातील विनंती मोघम स्वरुपाची आहे. त्यामुळे माझ्या मते वादींना या न्यायालयाकडून नेमका कोणता दिलासा हवा आहे व नेमका कोणता आदेश हवा आहे याबाबत स्पष्ट विनंती नमुद करुन अर्ज

दाखल करण्याबाबत वादींना निर्देशित करणे आवश्यक आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१) वादींना या न्यायालयाकडून नेमका कोणता दिलासा हवा आहे व नेमका कोणता आदेश हवा आहे याबाबत स्पष्ट विनंती नमुद करुन वादींनी अर्ज दाखल करावा.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.09.04 17:32:36 +0530

दिनांकः– ०४/०९/२०२४ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड २रे सह दि. न्या. व.स्तर, कराड.